**<u>नियमित दिवाणी दावा क्र.२१५/२००४ मधील निशाणी १८२ वरील आदेश</u> :**

१. प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र.३ ने तहसीलदार, श्रीगोंदा किंवा त्या कार्यालयातील माहीतगार इसम यांना साक्षी समन्स काढण्यासाठी दाखल केलेला आहे. इतर प्रतिवादी व वादीने त्यास आक्षेप घेतलेला आहे.

२. प्रतिवादी क्र.३ च्या वतीने ॲड. श्री. पी. बी. क्षीरसागर तसेच वादीचे वतीने ॲड. श्री. पी.व्ही. देशमुख यांचा युक्तीवाद ऐकला. इतर प्रतिवादींतर्फे युक्तीवाद नाही.

३. तेंव्हा एकच वादप्रश्न निश्चीतीकरणासाठी उपस्थित होतो तो असा की, ‘‘मागणी प्रमाणे अर्ज मंजूर करता येईल का ?’’ या वरील माझा निष्कर्ष मी खालील नमूद कारणांमुळे ‘‘**नकारार्थी**’’ नोंदविला आहे.

## <u>कारणमिमांसा</u>

४. प्रतिवादी क्र.३ चे थोडक्यात अभिकथन असे की, वाद मिळकतीबाबत उपविभागीय अधिकारी, पारनेर भाग अहमदनगर यांच्या कार्यालयात आर.टी.एस. अपील क्र.४२/१९७६ व ३३/१९७६ चे काम चालून त्यांच्या आलेल्या निर्णयाप्रमाणे १९८२ साली रोजगार हमी योजना अव्वल कारकून श्रीगोंदा यांच्या न्यायालयात आर.टी.एस. /चिखली/८२ अन्वये केसचे कामकाज चालून त्यात दिनांक ०१/१२/१९८२ रोजी निर्णय झालेला आहे. त्या प्रकरणातील कागदपत्रे या न्यायालयात दाखल करणे आवश्यक आहे. परंतु, जून २०१६ पासून प्रतिवादीने वेळोवेळी पाठपुरावा करुन देखील त्यास सदर नकला देण्यात आलेल्या नाहीत.

५. लेखी उत्तराची मागणी करुनही काहीच उत्तर दिले जात नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र.३ ला कागदपत्रे दाखल करता आलेली नाहीत. ही कागदपत्रे प्रतिवादी क्र.३ ला मिळतील अशी खात्री वाटत नाही म्हणून समन्स काढण्यात यावे.

६. इतर प्रतिवादींचे म्हणणे असे की, सदर दस्तांच्या प्रमाणित प्रती प्रतिवादी दाखल करु शकतो आणि प्रतिवादी क्र.३ च्या अभिकथनापेक्षा वेगळा पुरावा प्रतिवादी देऊ पाहात आहे.

७. वादीच्या म्हणण्याप्रमाणे प्रतिवादीने कैफीयतीसोबत किंवा पुरावा सुरु होण्यापूर्वीच कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक होते परंतु प्रतिवादी विलंब करत आहे, वगैरे.

८. प्रतिवादी क्र.३ मागणी करत असलेली कागदपत्रे कोणत्या प्रकारे दावा विषयाशी संबंधित आहेत या बाबत प्रतिवादीचे कोणतेही अभिकथन नाही. सदर आर.टी.एस. प्रकरणातील निर्णय प्रस्तुत प्रकरणाशी कोणत्या प्रकारे संबंधीत आहे याचाही ऊहापोह अर्जामध्ये नाही. कागदपत्रे प्रतिवादी क्र.३ ने जून २०१६ पासून तहसील कार्यालयाकडे मागितलेली आहेत या बाबतही कोणताही पुरावा नाही.

९. प्रतिपक्षाने योग्य प्रकारे आक्षेप घेतल्याप्रमाणे प्रतिवादी क्र.३ ज्या कागदपत्रांवर पुराव्या संदर्भात अवलंबून आहेत, ती कागदपत्रे कैफीयतीसोबत किंवा पुरावा सुरु होण्यापूर्वी दाखल करणे आवश्यक होते मात्र त्या बाबतही प्रतिवादी क्र.३ कडून कोणतेही स्पष्टीकरण नाही. दावा २००४ सालातील आहे मग संबंधित कागदपत्रे मिळविण्यासाठी प्रतिवादी क्र.३ ने एवढा विलंब का केला याचेही स्पष्टीकरण नाही. अशा परिस्थितीत कागदपत्रे दाखल करण्याची ही योग्य स्थिती नसल्यामुळे आणि वर नमूद सर्व कारणांमुळे मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करते :-

**-: <u>आदेश</u> :-**

१. अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

(खुल्या न्यायालयात निवेदित व जाहीर).

(वर्षा बा. पारगांवकर)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
श्रीगोंदा.

दिनांक : २६/०९/२०१६.